# महिलांवरील अत्याचारासंदर्भात करण्यात आलेल्या उपाय योजना

**१.** साध्या वेशातील महिला पोलीसांची नेमणुक पुणे पोलीस आयुक्तालयातील गर्दीचे ठिकाणी उदा. रेल्वे स्थानक, बस स्थानक, सिनेमा हॉल, सार्वजनिक बागा, शैक्षणिक संस्था, प्रमुख धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी महिलांची उपस्थिती राहात असल्याने त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन संबंधित पोलीस स्टेशनतर्फे सध्या वेशातील महिला पोलीसांची व इतर पोलीस कर्मचारी यांची डयुटीकामी नेमणुक करण्यात आली आहे.

**२.** पुणे पोलीस आयुक्तालयातील गर्दीचे ठिकाणी उदा.रेल्वे स्थानक, बस स्थानक, सिनेमा हॉल, सार्वजनिक बागा, शैक्षणिक संस्था, प्रमुख धार्मिक स्थळे इत्यादी महत्वाच्या गर्दीचे ठिकाणी सिसी टि.व्ही. कॅमेरा लावण्याबाबत सुचना करण्यात आल्या आहेत व त्याची अंमलबजावणी करून घेण्यात येत आहे.

**३. शैक्षिणक संस्था व आय.टी. कंपन्यांमध्ये जागृती** – पुणे पोलीस आयुक्तालयातील शैक्षिणक संस्था व आय.टी. कंपन्यांमध्ये जागृती करण्याकरीता महिलांचे सुरक्षिततेविषयी कायदयाची माहिती होण्याकरीता कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.

**४. सार्वजनिक वाहनात होणा-या छेडछाडीबाबत** - पुणे पोलीस आयुक्तालयातील सार्वजनिक वाहन (सार्वजनिक बस, रिक्षा, पी.एम.टी., रेल्वे इत्यादी ) यामध्ये होणा-या छेडछाडीबाबत सदर वाहन चालकांना सुचना देण्यात आल्या आहेत जो कोणी इसम वाहन चालवित असताना महिलांची छेडछाड करण्याचा प्रयत्न करील त्या वाहन चालकावर कायदेशीर कारवाई करण्यात येते. तसेच १०९१ हा महिला हेल्पलाईनचे पोस्टर सदर वाहनांमध्ये लावण्यात आले आहेत.

**५. महिला हेल्पलाईन** - दिनांक १८/११/२०११ पासुन महिलांच्या सुरक्षिततेकरिता **१०९१ (टोल फ्री) महिला हेल्पलाईन** सुरू करण्यात आली आहे. सदर हेल्पलाईन ही पोलीस आयुक्त कार्यालयातील नियंत्रण कक्ष येथे २४ तास कार्यरत आहे. सर्वसाधारणपणे दिवसातुन **१०९१** या हेल्पलाईनवर महिलांच्या तक्रारीबाबत दोन ते तीन कॉल्स येतात त्यामध्ये महिला आपल्या तक्रारी देतात व त्यांना ज्या ठिकाणी त्रास होत असेल व त्यांना पोलीसांची मदत हवी असेल त्यावेळी त्यांना जेथे त्रास होत असेल त्या हद्दीत नजिकच्या पोलीस स्टेशनला वायरलेसवरुन कळवुन सदर पोलीस स्टेशनची बिट मार्शल किंवा टु- मोबाईल हे तात्काळ पाच मिनटात पोहचतात व मदत केली जाते.

**६.** रेल्वे स्थानक, बस स्थानक, सिनेमा हॉल, सार्वजनिक बागा, शैक्षणिक संस्था, प्रमुख धार्मिक स्थळे वर्दळीचे ठिकाणी महिलांना छेडछाड करणा-या इसमांविरूध्द कठोर शिक्षेचे प्राधान असल्याचे बोर्ड तयार करुन लावण्यात आलेले आहेत.

**७.** पोलीस स्टेशनमध्ये स्वागत कक्षात महिला कर्मचा-याची नेमणुक करण्यात आलेली आहे. अत्याचाराबाबत किंवा काही पुरुषांविरुध्द किंवा इतर तक्रार असल्यास त्या पिडीत महिलांना पोलीस स्टेशनमध्ये पुरुष अधिकारी किंवा कर्मचा-यांशी बोलताना किंवा माहिती विचारताना दडपण येते. व त्यामुळे त्या मनमोकळेपणाने आपली तक्रार पुरूष अधिकारी किवा कर्मचा-यांशी बोलु शकत नाही. याकरिता प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये पोलीस स्टेशनच्या दर्शनी भागामध्ये स्वागतकक्षाची स्थापना करून पिडीत व अशिक्षित महिलांना मार्गदर्शन करण्याठी स्वागत कक्षामध्ये महिला पोलीस कर्मचा-यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

**८. पुणे शहर मधिल महिलांच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या उपययोजना** पुणे पोलीस आयुक्तलयातील प्रत्येक पोलीस स्टेशनला **महिला पोलीस बिट मार्शल** नेमण्यात आले आहे. महिला बिट मार्शलमुळे समाजामध्ये महिलांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. तसेच महिला बिट मार्शल हया आपल्या हद्दीत असणा-या मुली शिकत असलेल्या शाळा, कॉलेजमध्ये जाऊन तेथील प्राचार्य व मुख्याध्यापक यांना भेटून सदर शाळा व कॉलजेमध्ये तक्रारपेटी ठेवलेली आहे व त्यामध्ये मुलींच्या काही तक्रारी असतील तर त्या तक्रारीचे निवारण महिला बीट मार्शलमार्फत केले जाते तसेच, बीपीओ, बसस्टॉप व महिलांच्या गर्दीच्या ठिकाणी ते थेट महिलांशी संवाद साधत असल्यामुळे अशा ठिकाणी टिंगलटवाळी तसेच छेडछाडीच्या प्रकारास आळा बसला आहे. करण्याचे प्रकार कमी झालेले आहेत. महिला बिट मार्शलमुळे महिला हया त्यांच्याशी थेट संवाद साधत असल्याने महिलांचा पोलीसांच्याशी संपर्क वाढल्याने महिला व मुलींमध्ये सुरक्षिततेची भावना वाढली आहे.

९. पुणे पोलीस आयुक्तलयातील प्रत्येक पोलीस स्टेशनला आपल्या हद्दीतील शाळा, कॉलेज, आयटी कंपनी येथे महिला सुरक्षाविषयी मार्गदर्शनपर **कार्यशाळा** आयोजित करण्यात आली.

१०. पुणे पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस स्टेशनला शाळा, कॉलेज येथे अचानक भेट देवुन **रोड रोमियोंवर प्रतिबंधात्मक कारवाई** केली जाते.

११. महिलांना शाळा, कॉलेज मध्ये स्वसंरक्षणासाठी **कराटेचे प्रशिक्षण** दिले जात आहे.

१२. पुणे पोलीस आयुक्तलयातील प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एस.टी.स्टॅण्ड, गर्दीच्या ठिकाणी जेथे महिला जास्त प्रमाणात असतात तेथे **पेट्रोलिंग** वाढवण्यात आलेली आहे.

१३. पुणे पोलीस आयुक्तालयातील महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मागील ८ महिन्यांपासुन **पोलीस मुख्यालय येथे कराटे प्रशिक्षण** व स्व संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाते. आत्तापर्यंत साधारण ३०० महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

१४. महिलांचे काही वैवाहिक किंवा इतर पुरषांविरुध्द तक्रारी असतील तर अशी तक्रार ते लेखी स्वरुपात पोलीस आयुक्त कार्यालय येथे करु शकतात अशा तक्रारींचे निवारण करण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये सन २००८ मध्ये **महिला सहाय्य कक्षाची स्थापना** करण्यात आलेली आहे. व त्या कार्यालयात समुपदेशनाव्दारे महिलांच्या तक्रारीचे निवारण कार्यक्षम खाजगी समुपदेशकांव्दारे करण्यात येते त्याकरीता महिला सहाय्य कक्षामध्ये १४ खाजगी समुपदेशांची नेमणुक करण्यात आलेली आहेत.

१५. संबंधित असलेले अधिकार व महिलांच्या तक्रारीसंबंधीत कायदयाची कलमे याचे महिलांना मार्गदर्शनासाठी वेगवेगळया शाळा, २० कॉलेज, २५ आयटी कंपनी तसेच १५ झोपडपट्टयांमध्ये **परिसंवाद** घेण्यात आले आहेत.

१६. महिलांचे कायदयाविषयक **माहीती पुस्तीका** तयार करण्यात आलेली असून सदर पुस्तकाचे वाटप आयटी कंपनी, कॉलेजस येथे करण्यात आलेले आहे. त्यामुळे महिलांमध्ये स्वतःच्या कायदेशीर हक्कांबाबत व कायदयांबाबत जागृती करण्यात आली आहे.

**१७.** साखळी चोरीच्या वाढत्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी प्रत्येक परिमंडळामध्ये एक महिला पोलीस निरीक्षक यांची नेमणुक करण्यात आलेली असून त्या पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात महिलांनी स्वतःचे दागिन्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत **माहीतीची चित्रफिती** तयार करण्यात आलेली आहे व ती दाखवून त्याबाबत परिसंवाद आयोजित करण्यात येत आहे.

**१८. कार्यशाळा** –

१. पुणे पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील सर्व महिला अधिकारी व कर्मचारी व इतर अधिकारी याचेकरीता कायदयातील नविन बदलाबाबत तसेच त्यांचे तपासाबाबत दि. ०६/०१/२०१५ रोजी दोन कार्यशाळा आयोजित केल्या.

२. दिनांक ०८/०१/२०१५ रोजी १५.३० ते १६.३० वा.पर्यत कन्याशाळा मुलींची, सदाशिव पेठ पुणे येथे महिलांच्या सुरक्षितेबाबत लेक्चर.

३. दिनांक ०८/०१/२०१५ ते दि.१०.०१.२०१५ रोजी पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे येथे १०.०० ते १७.०० वा पर्यंत रेंजिग डे चा कार्यक्रम राबविला.

४. दिनांक १२/०१/२०१५ रोजी १५.०० ते १६.०० वा.पर्यत हुजुरपागा मुलींची, सदाशिव पेठ पुणे येथे महिलांच्या सुरक्षितेबाबत लेक्चर.

५. दिनांक २४/०१/२०१५ रोजी १५.०० ते १६.०० वा.पर्यत नेहरु मेमोरियल हॉल येथे महिलांच्या सुरक्षितेबाबत लेक्चर.

६. दिनांक २८/०१/२०१५ रोजी १५.०० ते १६.३० वा.पर्यत औध पुणे येथे अंगणवाडी शिक्षिका ७० ते ७५ महिला यांना महिला सुरक्षेबाबत लेक्चर

७. दिनांक ०४/०२/२०१५ रोजी १७.०० ते १९.०० वा.पर्यत न्यु डॉन स्कुल,कोंढवा खुर्द पुणे येथे महिला मेळावामध्ये महिलांच्या सुरक्षितेबाबत लेक्चर. सदर कार्यक्रमास १००० ते १५०० महिला उपस्थित होत्या.

८. दिनांक ०७/०२/२०१४ रोजी विधानभवन पुणे येथे १५.३० ते १७.०० वा पर्यंत मा.जिल्हाधिकारी पुणे व महिला व बालविकास विभागाचे अधिकारीसह मनोधैर्य योजना व महिलांच्या संरक्षणा संदर्भात मिंटिग.

९. दिनांक ०३/०३/२०१५ रोजी ११.०० ते १४.०० वा. पर्यत एमडी न्यु इन्शुरन्स कंपनी वडगाव शेरी पुणे १४ येथे महिलांच्या सुरक्षितेबाबत लेक्चर. सदर कार्यक्रमास १०० ते १५० महिला उपस्थित होत्या.

१०. दिनांक २७/०३/२०१५ रोजी ११.०० ते १४.०० वा. पर्यंत मा.जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे महाराष्ट्र महिला आयोगाच्या सदस्या श्रीमती चित्रा वाघ यांच्यासह पुणे शहरातील महिलांच्या सुरक्षे संदर्भात मिंटिग.

११. दिनांक १८/०५/२०१५ रोजी विधानभवन पुणे येथे ११.३० ते १२.३० वा पर्यंत मा.जिल्हाधिकारी पुणे व महिला व बालविकास विभागाचे अधिकारीसह मनोधैर्य योजना व महिला लोकशाही दिन संदर्भात मिंटिग.

१२. दिनांक ०१/०८/२०१५ रोजी १०.०० ते १२.०० वा. पर्यत टिकाराम कॉलेज, खडकी येथील विद्यार्थी व विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

१३. दिनांक ०१/०८/२०१५ रोजी ११.३० ते १३.०० वा. पर्यत हिरे हायस्कूल, लक्ष्मीनगर, पर्वती येथील विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

१४. दिनांक २६/०८/२०१५ रोजी १०.३० ते १४.०० वा. पर्यत टिकाराम कॉलेज, खडकी येथील विद्यार्थी व विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

१५. दिनांक ०१/०९/२०१५ रोजी १०.०० ते १२.०० वा. पर्यत गरवारे कॉलेज, डेक्कन, पुणे येथील विद्यार्थी व विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

१६. दिनांक ०५/०९/२०१५ रोजी १६.०० ते १८.०० वा. पर्यत इंजिनिअरिंग कॉलेज, शिवाजीनगर, पुणे (सीओईपी) येथील विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

१७. दिनांक ०९/०९/२०१५ रोजी १३.०० ते १५.०० वा. पर्यत मार्डन इंजिनिअरिंग कॉलेज, शिवाजीनगर, पुणे येथील विद्यार्थी व विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

१८. दिनांक १०/०९/२०१५ रोजी १०.०० ते १२.०० वा. पर्यत ग्यानबा मोझे हायस्कूल, येरवडा, पुणे येथील विद्यार्थी व विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

१९. दिनांक ११/०९/२०१५ रोजी १२.०० ते १३.०० वा. पर्यत संस्कार मंदिर संस्था, वारजेमाळवाडी, पुणे येथील महिलांना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

२०. दिनांक १४/०९/२०१५ रोजी १६.०० ते १७.०० वा. पर्यत हिमगिरे विद्यालय, येरवडा, पुणे येथील विद्यार्थिनींना महिला/मुलींचे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन.

२१. दिनांक ०३/१०/२०१५ रोजी १०.३० ते १३.३० वा. पर्यंत शिवाजीनगर मुख्यालय, पुणे येथे आयोजित कार्यशाळेत उपस्थित कर्मचा-यांना महिलांवरील अत्याचारासंदर्भात दाखल होणा-या गुन्हयांचे अनुषंगाने मार्गदर्शन.

२२. दि. ०७/१०/२०१५ रोजी ११.०० ते १३.०० वा. पर्यंत संत ज्ञानेश्वर वसतीगृह येथे महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शन.

२३. दिनांक २७/१०/२०१५ रोजी १०.०० ते १२.३० वा. पर्यत आझम कॅम्पस, पूना कॉलेज येथे महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन.

२४. दिनांक २७/१०/२०१५ रोजी १५.०० ते १७.०० वा. पर्यंत विधानभवन येथे जिल्हा महिला सल्लागार समिती बैठक व मनोधैर्य योजनेबाबत बैठक.

२५. दि. २८/०१/२०१६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या कालावधीत मामासाहेब मोहोळ कॉलेज येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन.

२६. दि. २९/०१/२०१६ रोजी सकाळी १०.३० ते १२.३० या कालावधीत सिंहगड इंस्टीटयुट, वडगाव बुाक, पुणे येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन.

२७. दि. ०३/०२/२०१६ रोजी सकाळी १५.०० ते १७.०० या कालावधीत एस.एम. जोशी हायस्कूल,हडपसर,पुणे येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन.

२८. दि. ०४/०२/२०१६ रोजी सकाळी ११.०० ते १३.०० या कालावधीत सिंहगड कॉलेज, येवलेवाडी, पुणे येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन. (पोउनि कुदळे)

२९. दि. ०५/०२/२०१६ रोजी सकाळी ११.०० ते १३.०० या कालावधीत ज्ञानगंगा हायस्कूल, दत्तवाडी, पुणे येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन. (पोउनि कुदळे)

३०. दि. १२/०२/२०१६ रोजी सकाळी ११.०० ते १३.०० या कालावधीत एस.एन.डी.टी. कॉलेज, कोथरुड, पुणे येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन.

३१. दि. १५/०२/२०१६ रोजी सकाळी १४.०० ते १६.०० या कालावधीत महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन.

३२. दि. १७/०२/२०१६ रोजी सकाळी १०.०० ते १३.०० या कालावधीत मामासाहेब मोहोळ कॉलेज, कोथरुड, पुणे येथील विद्यार्थ्यांना महिलांचे सुरक्षिततेच्या अनुषंगाने मार्गदर्शन.